शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी अर्ज मागविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०११/(२४०/११)/ मशि ४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०११

**वाचा:** शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/(१९३/१०)/ मशि ४, दि. ३० ऑक्टोबर, २०१०.

**परिपत्रक**

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी अर्ज मागविण्याची कार्यपध्दती दिनांक ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाध्दारे विहीत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये महाविद्यालयासाठी जागेबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या निकषाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. या निकषांनुसार महानगर परिसरात २ एकर व इतर शहरात ५ एकर जागा अनिवार्य ठेवलेली आहे. तथापि महानगरपालीका क्षेत्रांमध्ये जागांच्या प्रचंड किंमती विचारात घेता एवढी जागा उपलब्ध होणे किंवा महाविद्यालय सुरु करण्यासाठी किंमती जागा शैक्षणिक संस्था खरेदी करतील हे बहुतांशी अशक्य वाटत असल्याने त्यामध्ये काही प्रमाणात वास्तववादी त्याचबरोबर महाविद्यालयाची अनिवार्य गरज पूरी होईल असे जागेबाबत निकष सुधारित करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने परिशिष्ट "क" मधील अनुक्रमांक १० मध्ये नमूद केलेल्या सुधारित निकषांसह सन २०१२-१३ करिता नवीन महाविद्यालय (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी अर्ज मागविण्याच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ (३) मधील तरतूदीनूसार सर्व अकृषि विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देवून अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्विकारले जाणार नाहीत असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा,
२. सदर अर्ज दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयातील परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमून्यातच मागवावेत.
३. विद्यापीठांनी महाविद्यालयाकडून मान्यतेबाबतचे अर्ज मागवितांना इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने म्हणजेच व्ही.सी.डी. वर व नेहमीच्या पध्दतीने Hard Copy वर विद्यापीठांकडे सादर करण्याबाबतच्या सूचना जाहिरातीत देण्यात याव्यात. त्यामध्ये संस्थांमध्ये असलेल्या सोयी सुविधांचे व कर्मचारी/ शिक्षक यांच्या विषयीचे व्हिडिओ चित्रीकरण असावे.
४. प्रस्ताव घेतांना ते फक्त **DVB-TT-Surekh** या फॉन्टमध्येच घेतले जावेत व त्याच फॉन्ट मध्ये शासनास सादर करावेत.

५. सदर अर्ज विद्यापीठांनी स्विकारतांना व शिफारस करतांना दि. ३० ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयामधील तरतूदीनूसार कार्यवाही करण्यात यावी व अर्जासोबत या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "ब" आणि "क" प्रमाणे कागदपत्रे क्रमवार पध्दतीने जोडण्यात यावीत.

६. नवीन व्यावसायीक व पारंपारिक महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडयांचे प्रस्ताव मागवितांना व शिफारस करतांना शासनाच्या दिनांक ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयामधील परिशिष्ट "ब" आणि "क" मध्ये सुधारणा करण्यात येत असून यासोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" आणि" क" प्रमाणे विद्यापीठाने कार्यवाही करावी.

७. बायोटेक्नॉलॉजीच्या नवीन अभ्यासक्रम /विषयांना मान्यता देण्याचे प्रस्ताव वरील नमूद दि. ३०.१०.२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच डॉ. कोळसकर यांनी अशा प्रस्तावांच्या छाननीसाठी जे निकष ठरविले होते त्या निकषांप्रमाणे छाननी करुन केवळ पात्र प्रस्ताव शिफारशीत करावेत. सदर निकषांचा तक्ता " ड" आणि "इ" येथे सोबत जोडण्यात येत आहेत.

हे आदेश राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०२५१६४४५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(ग. सं. कचरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व विभागीय सहसंचालक , उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
४. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
५. मशि / विशि तील सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवडनस्ती मशि ४

## परिशिष्ट ब
## अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची सूची

| अ.क्र | तपासणी सूची | शेरा |
|---|---|---|
| १ | संस्थेचा नवीन महाविद्यालय (व्यावसायिक व पारंपारिक ), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय व वाढीव तुकडया मंजूरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | |
| ३ | अर्जासोबत संस्थेच्या घटनेची सांक्षांकित प्रत | |
| ४ | अर्जासोबत संस्थेचा मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | |
| ५ | किमान रु. ५०००००० चे फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत | |
| ६ | अर्जासोबत चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | |
| ७ | संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | |
| ८ | अर्जासोबत संबंधित राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | |
| ९ | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र | |

## परिशिष्ट - क

संस्थेचे नाव :-

ठिकाण :-

विद्यापीठाचे नाव :-

विद्याशाखा :-

| अ.क्र | तपासणी सूची | शेरा |
|---|---|---|
| १ | संस्थेचा नवीन महाविद्यालय मंजूरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | |
| ३ | अर्जासोबत संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत | |
| ४ | अर्जासोबत संस्थेचा मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | |
| ५ | किमान रु. ५००००० चे फिक्स डिपॉजिटची प्रमाणित प्रत | |
| ६ | अर्जासोबत चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत | |
| ७ | संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | |
| ८ | अर्जासोबत संबंधित राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | |
| ९ | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता अर्जासोबत महाविद्यालयाचा नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र | |
| १० | १) **स्वतःची जागा** -(अ) "अ" "ब" आणि "क" वर्ग महानगरपालीका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत. | |
| | (ब) ड वर्ग महानगरपालीका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | |
| | (क) उर्वरित सर्व क्षेत्रासाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्राची प्रमाणित प्रत. | |
| | २) **भाडयाची जागा** - (अ) अ,ब आणि क वर्ग महानगरपालीका क्षेत्रात १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | |
| | ब) ड वर्ग महानगरपालिका व नगरपालीका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | |
| | (क) उर्वरित सर्व क्षेत्रासाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडे तत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | |
| ११ | महाविद्यालयाची मागणी करण्यापूर्वी संस्थेच्या नोंदणीस किमान एक वर्ष पूर्ण झाले असल्याचे कागदपत्र / दस्ताऐवज | |
| १२ | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृह, गटार लाईन इत्यादीची सोय. | |
| १३ | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (किमान १ लाख रुपये प्रत्येक विषयासाठी राखीव) | |
| १४ | ग्रंथालयात पुस्तकाची सुविधा (किमान ५०० पुस्तक) | |
| १५ | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कॅन्टीन, हेल्थ केअर सुविधा | |
| १६ | संबंधीत संस्था प्रस्तावित महाविद्यालयासाठी क्रिडांगण भाडयाने वापरणार असल्यास अर्जासोबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत भाडे कराराची साक्षांकित प्रत. | |
| १७ | अध्यापकांकरीता व विद्यार्थीनींकरीता स्वतंत्र कॉमन रुम. | |
| १८ | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीतील सेमिनार रु.,लेक्चर रुम, फॅकल्टी रुम, स्टाफ रुम, प्राचार्यांची रुम, होस्टेल रुम, इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | |
| १९ | प्रस्तावित महाविद्यालयास प्रथम संलग्नीकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे त्या ठिकाणी स्वतःचे इमारतीमध्ये महाविद्यालय स्थलांतरित करत असल्याबाबतचे हमीपत्र. | |
| २० | शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००९/(३०१/०९)/मशि-४, दि. २५/९/२००९ अन्वये ज्या संस्थेची यापूर्वीचे महाविद्यालये अस्तित्वात आहेत अशा संस्थेने नवीन महाविद्यालयाची मागणी केल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे नॅक / एनबीए मुल्यांकन अथवा पुनर्मुल्यांकन असणे आवश्यक आहे, किंवा किमान अर्ज केलेला असावा. | |

## तक्ता "ड"

## पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

१. हा विषय सुरु करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे.

२. सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरु झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच असणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन "अ" श्रेणीचे असणे आवश्यक आहे.

४. सदर महाविद्यालनयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे.

५. या महाविद्यायात बायोलॉजी, मायक्रोबायॉलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे.

६. भौतीक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे.

७. पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत.

८. विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एसस्सी मायक्रोबायॉलॉजी विषयाचा अधिव्याख्याता फूलटाईम पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी.केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल.

९. सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा सहाय्यक पाहिजेत.

१०. विषय सुरु ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे.

## तक्ता "ड"

## पदवी स्तरावर बायोटेक्नॉलॉजी विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

१. हा विषय सुरु करताना त्या महाविद्यालयात विज्ञान शाखा असणे आवश्यक आहे.

२. सदर महाविद्यालयात विज्ञान शाखा ४ वर्षापूर्वी सुरु झालेली पाहिजे म्हणजेच विज्ञान शाखेची एक बॅच असणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन "अ" श्रेणीचे असणे आवश्यक आहे.

४. सदर महाविद्यालनयातून बायोलॉजीची एक बॅच बाहेर पडली पाहिजे.

५. या महाविद्यायात बायोलॉजी, मायक्रोबायॉलॉजी, केमेस्ट्री हे विषय पदवी स्तरावर असणे आवश्यक आहे. त्या विषयातील पदवीधारकांची किमान एक बॅच पूर्ण झाली पाहिजे.

६. भौतीक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे.

७. पूर्णवेळ पात्रताधारक शिक्षक असले पाहिजेत.

८. विद्यापीठ शैक्षणिक अर्हतेप्रमाणे दोन अधिव्याख्याते एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषयातील व एक एम.एसस्सी मायक्रोबायॉलॉजी विषयाचा अधिव्याख्याता फुलटाईम पाहिजे. चौथा शिक्षक एम.एस्सी.केमेस्ट्री, सांख्यीकी पाहिजे. प्रस्तुत अधिव्याख्याता पूर्णवेळ नसला तरी चालेल.

९. सदर महाविद्यालयात दोन प्रयोगशाळा सहाय्यक पाहिजेत.

१०. विषय सुरु ठेवण्यासाठी महाविद्यालयाची आर्थिक परिस्थिती चांगली असली पाहिजे.

## तक्ता " इ "

## पदव्युत्तर स्तरावर महाविद्यालयात विषय सुरु करण्यासाठी आवश्यक निकष

१. मागणी केलेल्या महाविद्यालयात बी. एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा विषय असला पाहिजे.

२. सदर महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन किमान "अ"श्रेणी असले पाहिजे.

३. विज्ञान शाखेचे सर्व विषय असणे आवश्यक आहे.

४. बी. एस्सी. बायोटेक्नॉलॉजीचा विभाग तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या असला पाहिजे.

५. तीन पूर्णवेळ व एक अर्धवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे.

६. दोन प्रयोगशाळा सहाय्यक असणे आवश्यक आहे.

७. किमान ६०० चर्ग फूट जागेच्या दोन प्रयोगशाळा असाव्यात.

८. भौतिक व मूलभूत सुविधा असणे आवश्यक आहे.